# मन

कल्पनेत रंगलेले चित्र मी भावनांत गुंफले
मनास भावलेले भाव मी शब्दांत बांधले
स्वप्नातल्या कळ्या मनात माझ्या फुलल्या
शब्दांत बांधुनी त्या मी कवितेत माळल्या
कळ्यांच्या सुगंधाने मन माझे वेडावले
मनास भावलेले भाव मी शब्दांत बांधले
विचारांच्या महालात मन माझे हरवले
कल्पनांच्या आरशात मी त्यास शोधले
मधुर शब्द सुरांनी त्या कल्पनेस सजविले
मनास भावलेले भाव मी शब्दांत बांधले
उमलणाऱ्या कल्पनात चित्त माझे गुंतले
स्वप्नांच्या अनंत रंगात ते रंगले
शब्दवेलीवर चढत ते बहरले
मनास भावलेले भाव मी शब्दांत बांधले

■

**– पद्माकर चित्रे**

**('शब्दांची फुलपाखरे' या कवितासंग्रहातून)**